# वन अधिकार (FRA) कायद्याच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या समितीला माहिती देण्याबाबत आवाहन

वन आणि पर्यावरण मंत्रालयाने आदिवासी कार्य मंत्रालयासह अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक जंगलवासी (वन अधिकार मान्यता) कायदा २००६, अर्थात फॉरेस्ट राइट्स ॲक्ट FRA, या कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी होण्यासाठी धोरणात्मक व संस्थात्मक बदल आवश्यक वाटल्यास तशा सूचनाही ही समिती देईल. समितीच्या सदस्यांची यादी व जबाबदाऱ्यांचा तपशील इंटरनेटवर उपलब्ध आहे - पहा ः
http://moef.nic.in/downloads/public-information/Reconstitute%20Committee.pdf

व्यापक प्रमाणांत लोकांशी संपर्क साधून समिती हे काम करू इच्छिते. यासाठी सभांचे, कार्यशाळांचे व प्रत्यक्ष भेटींचे आयोजन केले जाईल.

या घोषणेसह ही समिती कायद्याच्या अंमलबजावणीबाबत माहिती पाठवण्याची आपल्याला विनंती करीत आहे. स्थानीय समुदाय, सरकारी संस्था, इतर संस्था व संशोधक, तसेच ज्यांना कायद्याच्या अंमलबजावणीविषयी माहिती असेल किंवा ज्यांची त्याबाबत काही निरीक्षणे असतील, अशा सर्वांकडून समिती माहिती मागवत आहे. कायद्याचा फेरविचार किंवा त्यात बदल करण्याचा या समितीचा उद्देश नाही, हे कृपया लक्षांत घ्यावे.

विशेषकरून कायद्याच्या उत्तम अंमलबजावणीची उदाहरणे व त्यांबद्दल माहिती - केस स्टडी - त्याच प्रमाणे वाईट अंमलबजावणीच्या उदाहरणांची माहिती समितीला पाठवावी. माहितीसोबत त्याबाबतचे पुरावेही शक्यतो पाठावावेत. तसेच संपर्कासाठी आपला पूर्ण पत्ता व फोन क्रमांक वगैरे पाठावावा, म्हणजे स्पष्टीकरण लागल्यास समिती आपल्याशी संपर्क साधू शकेल. समितीच्या कामाबद्दल माहिती देणारी स्वतंत्र वेबसाइट लवकरच सुरु करण्यात येईल. दरम्यान आपण सारी माहिती लेखी स्वरूपात किंवा इंटरनेटवरून खाली दिलेल्या नाव-पत्त्यावर पाठवावी (किंवा आपण ती समितीच्या कोणत्याही सदस्याला पाठवू शकता).

राकेश कुमार डोगरा
सदस्य-सचिव, वन व पर्यावरण मंत्रालय / आदिवासी कार्य मंत्रालय - वन अधिकार समिती
सहायक महानिदेशक (शिक्षा)
भारतीय वानिकी अनुसंधान एवं शिक्षा परिषद
पी. ओ. न्यू फॉरेस्ट
देहरा दून 248006
ई-मेल dogrark@icfre.org
फोन ः 0135-2224850, 2758348, 9410148935 (मोबाइल)
फॅक्स ः 0135-2758571